


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com


वर्ष २ रे | अंक : ६२७ . वा | गुरुवार | दि. १४ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# महाभ्रष्टाचारी टेकाळे यांच्या अवैध व्यवहारांच्या चौकशीचे निघाले आदेश...

## टेकाळेंसमवेत महसूलचा एक अधिकारी आला गोत्यात...

**जनसंचलन/ बुलढाणा**

महसूल विभागातील सर्वाधिक भ्रष्ट अधिकारी असलेले मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्या अवैध संपत्तीच्या नियमबाह्य व्यवहारांची सखोल चौकशी करून त्यांना निलंबित करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना थेट अमरावती महसूल विभागीय कार्यालयातून प्राप्त झालेले आहेत. हा आदेश म्हणजे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने भ्रष्टाचाराविरोधात जी मोहीम उघडली आहे, त्याचे द्योतक आहे. या आदेशाने बुलढाणा महसूल विभागात खळबळ उडाली असून, टेकाळे यांनी स्वतः सह महसूल विभागातील एका अधिकाऱ्यालाही गोत्यात आणल्याचे बोलले जात आहे. महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात अत्यंत सविस्तर आणि पुराव्यांनिशी माहिती दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज ने आतापर्यंत प्रकाशित केलेली आहे. टेकाळे यांनी महसूल विभागात राहून जो काही अनिर्बंध भ्रष्टाचार केलेला आहे, त्यासाठी केवळ वृत्तमालिका प्रकाशित करूनच दैनिक जनसंचलन थांबला नाही, तर टेकाळे यांची अवैध संपत्ती, त्यांचे अवैध व्यवहार, सरकारला लावलेला चुना या सर्वांची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. खरेतर टेकाळे आतापर्यंत भयंकर मस्तीत होते. त्यांना वाटत होते की, आपले काहीही वाईट होणार नाही. आपण सर्व अधिकाऱ्यांना पद्धतशीर मॅनेज करू शकतो. तसं त्यांनी आजवर अनेक अधिकाऱ्यांना व्यवस्थित हाताळले आहे त्यामुळेच की काय बेबंद भ्रष्टाचार करूनदेखील टेकाळेंवर आजवर म्हणावी तशी प्रभावी कारवाई झालेली नाही. टेकाळे हे संघटनेचा आणि राजकीय लोकांचा दबाव आणून अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करीत असल्याची खात्रिलायक माहिती महसूल विभागातून प्राप्त झाली आहे. दैनिक जनसंचलन ने टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराविषयी सतत पाठपुरावा केला. त्याची माहिती वरिष्ठांपर्यंत पोहोचवली. त्याची परिणती आता दिसू लागली आहे. अमरावतीच्या विभागीय महसूल आयुक्त कार्यालयातील उपायुक्त संजय पवार यांनी एक पत्र थेट बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले आहे. त्यात निर्देश देण्यात आले आहेत की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या ४२ (ब), ४२ (क) व ४२ (ड) या कलमाअंतर्गत तहसीलदारांना सनद देण्याचे अधिकार असताना मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्याशी संगनमत करून मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे, त्यांची पत्नी ज्योती दत्तात्रय टेकाळे, दीपक दत्तात्रय टेकाळे, राजू दत्तात्रय टेकाळे आणि इतर चार जणांच्या नावे जांभरुण येथील गट नं. १३६ मधील २.८२ हेक्टर अर क्षेत्राच्या शेतजमिनीचा बेकायदेशीर एनएपी ३४ चा लेआऊट अकृषक सनद आदेश महसूलच्या एका मोठ्या अधिकाऱ्याने पारित केला आहे. हा व्यवहार पूर्णपणे बेकायदेशीर असून, अशाप्रकारचे गंभीर कृत्य करणाऱ्या मंडळ अधिकारी विजय टेकाळे व संबंधित दोषी अधिकाऱ्यांच्या विरोधा चौकशी लावावी, तसेच या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे, असे निर्देश देण्यात आलेले आहेत. या पत्रानंतर टेकाळे व संबंधित दोषी महसूल अधिकाऱ्यावर कारवाई होणार हे निश्चित झाले आहे. विशेष म्हणजे दैनिक जनसंचलन ने टेकाळे यांच्या अवैध संपत्तीचा खुलासा केल्यानंतर त्यांनी आपल्या व आपल्या नातेवाईकांच्या नावावरील अनेक प्लॉट हे दुसऱ्यांच्या नावे बक्षीसपत्र करून दिले आणि येथेच खऱ्या अर्थाने टेकाळे फसलेले आहेत. त्यांच्या जमिनीच्या अनेक अवैध व्यवहारांमध्ये महसूलच्या अधिकाऱ्यांचे हात ओले झाले आहेत. काहींची तर थेट टेकाळेंशी पार्टनरशीप असल्याचे बोलले जात आहे. झाले होते. घाबरगुंडी उडाल्याने टेकाळे यांनी स्वतःच्या नावावरील जमीन दुसऱ्यांच्या नावे करून अंगावरील घोंगडे झटकण्याचा केवीलवाणा प्रयत्न केला आहे. परंतु हा व्यवहार पूर्णपणे अवैध असून, याची खरेतर आयकर विभागाने दखल घेणे गरजेचे आहे. टेकाळे यांनी खरेतर आजवर भ्रष्टाचाराचे मोठमोठे विक्रम रचले आहेत. त्यांच्या भ्रष्टाचाराची जंत्री दैनिक जनसंचलन क सिटी न्यूजने बाहेर काढली आहे. परंतु एव्हढा भ्रष्टाचार आणि नालायकपणा करूनदेखील आजवर कुठलीही कारवाई टेकाळेंवर करण्यात आली नाही. हे सर्व काही वरिष्ठांच्या वरदहस्ताशिवाय शक्य नाही. टेकाळे हे स्वतःला




खूपच प्रामाणिक आणि साळसूद दाखवण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांच्या इतका भ्रष्ट, त्यांच्या इतका बेरकी, त्यांच्या इतका कपटी माणूस महसूल विभागात शोधूनदेखील सांपडणार नाही. आपल्या वरिष्ठांच्या आदेशांची पायमल्ली करणे, न्यायालयाच्या निर्णयावरदेखील कारवाई न करणे, भ्रष्टाचारातून अवैध संपत्ती जमा करणे, अवैध कामे करताना ज्या शासनाचा पगार घेतात, त्याच शासनाला लाखोंचा चुना लावणे, असे एक ना अनेक प्रकार टेकाळेंनी केलेले आहेत. परंतु आता शिशुपालाचे १०० अपराध पूर्णपणे भरले असून, आता कारवाई होणे अटळ आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या भ्रष्टाचारविरोधातील लढ्यात ही कारवाई एक मैलाचा दगड ठरणार आहे. जोपर्यंत टेकाळे व त्यांना वाचवणाऱ्या महसूलच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन आपली मोहीम अशीच सुरू ठेवणार आहे.

# संसदेच्या सुरक्षेत मोठी चूक अज्ञात दोघांचा सुरक्षा भेदून सभागृहात प्रवेश...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

संसदेचे हिवाळी अधिवेशनादरम्यान कामकाज सुरू असतानाच संसदेच्या सुरक्षेत मोठी चूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. लोकसभा सभागृहात कामकाजादरम्यान दोन अज्ञात व्यक्ती घुसल्याच्या प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकारानंतर लोकसभेचं कामकाज स्थगित करण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन तरुणांनी सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीतून टिअर गॅस कॅन घेऊन खासदार बसतात तेथे उड्या मारल्या. कामकाजादरम्यान घुसखोरी केलेल्या दोघांपैकी एकाचे नाव सागर असल्याचे सांगण्यात येत आहे. दोघेही खासदाराच्या नावाने असलेल्या लोकसभा व्हिजीटर पासवर संसदेत आले होते. खासदार दानिश अली यांनी सांगितले की, हे दोघे म्हैसूर येथील भाजप खासदार प्रताप सिम्हा यांच्या नवावर लोकसभा व्हिजीटर पास घेऊन आले होते. काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांनी सांगितले की, दोन तरूणांनी प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात उड्या मारल्या. त्यांनी काहीतरी फेकलं, ज्यामधून गॅस बाहेर येत होता. त्यांना खासदारांनी पकडलं आणि सुरक्षा रक्षकांनी त्यांना बाहेर काढलं. यानंतर सभागृहाचं कामकाज दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं आहे. हे निश्चितपणे सुरक्षेचे उल्लंघन आहे कारण आज आपण २००१ मध्ये ज्यांनी बलिदान दिले त्यांची पुण्यतिथी साजरी करत आहोत. खासदारांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभेत शुन्य प्रहरादरम्यान भाजप खासदार खरगेन मुर्मू बोलत होते, तेव्हा एका व्यक्तीने प्रेक्षक गॅलरीमधून उडी मारली. यानंतर दुसऱ्या व्यक्तीने देखील त्याच्या मागोमाग सभागृहात उडी मारली. यानंतर संसद सभागृहात खळबळ उडाली. काही खासदारांनी




दोन तरुणांना पकडलं, यानंतर संसदेच्या सुरक्षारक्षकांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांना संसद मार्ग पोलिस स्टेशनमध्ये घेऊन जाण्यात आले. दिल्ली पोलिसांच्या अँटी टेरर युनिटच्या स्पेशल सेल कडून या घुसखोरी करणाऱ्यांची चौकशी केली जात आहे.

# मुख्याधिकारी व विद्युत पर्यवेक्षकला लाच घेतांना अटक

**जनसंचलन/ जळगाव जामोद**



जळगाव जामोद येथील न.प.चे मुख्याधिकारी आणि न.प.चे विद्युत पर्यवेक्षक यांनी मागितलेली १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना या दोघांना १३ डिसेंबर रोजी एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले. जळगांव शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाचे बिल अदा केल्याचा मोबदला म्हणून संबंधित ठेकेदाराकडून मुख्याधिकारी आणि विद्युत पर्यवेक्षक या दोघांनीही लाच मागितली होती. लाच देण्याचा निर्णय संबंधित ठेकेदाराने घेतला व या संबंधीची तक्रार ठेकेदाराने अँटी करप्शन ब्युरो कडे केली होती. त्यांनी म्हटले होते की विद्युत पर्यवेक्षक दीपक शेळके यांनी स्वतःसाठी ६ हजार रुपये व मुख्याधिकारी आकाश डोईफोडे यांच्यासाठी ६ हजार रुपये अशी एकुण १२ हजार रुपयाची मागणी केली त्यांच्या तक्रारीवरून अँटी करप्शन ब्युरोच्या पथकाने १३ डिसेंम्बर सकाळी ११ वाजेच्या सुमारात सापळा रचून जळगाव जामोदचे ३२ वर्षीय मुख्याधिकारी आकाश डोईफोडे आणि विद्युत पर्यवेक्षक दीपक शेळके (३० वर्ष) या दोघांना तक्रारदाराकडून १२ हजार रुपयांची लाच घेताना नगर परिषदेतच रंगेहात पकडले. त्यानंतर शासकीय विश्रामगृह येथे दोन्ही आरोपींची चौकशी करण्यात आली. ही धाडसी कारवाई पो. उपअधिक्षक श्रीमती शितल घोगरे व पो नि सचिन इंगळे, महेश भोसले सापळा पथक स.फौ. शाम भांगे, पोहेकॉ. विलास साखरे, प्रवीण बैरागी, रवी दळवी, पो ना जगदीश पवार, विनोद लोखंडे, पोकॉ शैलेश सोनवणे, म.पो.कॉ. स्वाती वाणी आणि चालक पोना नितीन शेटे, पोकॉ अरशद शेख बुलढाणा यांच्या पथकाने केली . त्यांना मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र. आणि देविदास घेवारे, अपर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शन लाभले. सदर घटनेने तालुका प्रशासनामध्ये एकच खळबळ उडाली.

# नमो शेतकरी योजनेचा लाभ मिळविण्यासाठी बँक खाते सुरु असल्याची खात्री करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**



राज्य सरकारने केंद्र सरकारच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरु केली आहे. राज्यात योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून, शेतकऱ्यांना वार्षिक ६ हजार रुपयांचा लाभ देण्यात येत आहे. योजनेच्या पहिल्या हप्त्याचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांनी काही बाबी तपासून घ्याव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. शेतकऱ्याचे बँकेकडून खाते बंद किंवा गोठविले असल्यास लाभार्थ्यांने बँकेत जाऊन तपासून घ्यावे. ते सुरू करुन घ्यावे किंवा दुसरे सुरू असलेले खाते आधार संलग्न करुन घ्यावे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकेमध्ये खाते उघडावे. आधार क्रमांक बँक खात्याशी जोडलेला नसल्यास अथवा बँकेने एनपीसीआय पोर्टलवरून आधार क्रमांक डीसीडेड केला असल्यास बँकेशी संपर्क साधावा. बँकेने खात्यावर कमाल क्रेडीट मर्यादा निश्चित केली असल्यामुळे खाते धारकाने व्यवहार मर्यादा वाढवून घ्यावी. बऱ्याच कालवधीपासून खाते वापरात नसल्यास ते बंद असते. त्यामुळे खाते धारकाने बँकेशी संपर्क साधावा. त्याशिवाय अनिवासी बाह्य बँक खाते (एनआरई), भविष्य निर्वाह निधी, कॅश क्रेडीट खाते, कर्ज खाते किंवा मुदतठेव या प्रकारचे खाते असल्यास ते संलग्न करून घ्यावे. खाते धारकाने बँकेत जाऊन केवायसी प्रलंबित नसल्याची खात्री करून घ्यावी. त्यामुळे शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळू शकेल, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा मुख्यालयी महिला, मुलींची कुचंबना; वंचित युवाचा सुसू आंदोलनाचा इशारा...

## बुलढाणा शहरात प्रसाधनगृहांचा अभाव...

**जनसंचलन/ बुलढाणा**



जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बुलढाणा शहरात महिलांसाठी सुविधायुक्त प्रसाधनगृह नसल्याने महिला व तरुणींची मोठी कुचंबना होत आहे. बुलढाणाच नव्हेतर जिल्ह्यातील शहरांमध्ये हेच चित्र आहे. या गंभीर समस्येकडे वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. तीस दिवसांत महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधून द्यावीत; अन्यथा सुसू आंदोलनाचा मार्ग अवलंबवावा लागेल, असा इशारा पवार यांनी दिला आहे. महिलांची लघुशंकेबाबत होणारी गैरसोय तातडीने दूर करावी, यासाठी वंचित बहुजन युवा आघाडीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांना निवेदन पाठवले आहे.

बुलढाणा हे जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने येथे जिल्हाभरातून लोक येतात. यामुळे शहरामध्ये कायम रहदारी असते. मात्र, शहरात कुठेही स्वच्छतागृहांची नीट व्यवस्था केलेली नाही. त्यात विशेषतः महिलांच्या सोयीसाठी प्रसाधनगृह नाही. ग्रामीण भागातून येणाऱ्या महिला व मुलींना लघुशंकेबाबतच्या कुचंबनेला मोठ्या प्रमाणावर सामोरे जावे लागते. ही बाब महिलांची आब्रू वेशीवर टांगणारी आहे. या संवेदनशील विषयाकडे पालकमंत्र्यांनी लक्ष घालून महिलांची स्वच्छतागृहा अभावी होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

येत्या ३० दिवसांत या मागणीचा सकारात्मक विचार करून जिल्ह्यातील प्रत्येक शहरांमध्ये स्वच्छतागृह सुरू न केल्यास नाइलाजाने या प्रकरणाची तीव्रता लक्षात आणून देण्यासाठी शासनाविरोधात सुसू आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी दिला आहे. निवेदन देताना जिल्हा संघटक बाला राऊत, जिल्हा महासचिव अर्जून खरात, अनिल पारवे, किरण पवार, विजय पवार, योगेश हिवाळे उपस्थित होते.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# संदीप शेळके यांनी स्वीकारले रिधोऱ्यातील तीन भावंडांचे शैक्षणिक पालकत्व...

## आई-वडिलांचे छत्र हरवल्याने झाले आहेत पोरके...

जनसंचलन/मोताळा

राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीपदादा शेळके यांनी तालुक्यातील रिधोरा खंडोपंत येथील आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या भावंडांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच तिघांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. रिधोरा येथील संदीप मानकर हे मजुरी करुन प्रपंच चालवत होते. एक वर्षापूर्वी आजारात त्यांच्या पत्नीचे निधन झाले. तर गत महिन्यात त्यांचा सुद्धा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात दोन मुली आणि एक मुलगा आहे. काळाने आई-वडील हिरावल्याने ही भावंडं पोरकी झाली आहेत. मोठी मुलगी स्नेहल संदीप मानकर ही नववीत आहे. तर अपूर्वा ही सहावीत



आणि लहानगा समर्थ चौथीत शिकत आहे. खरं तर तिघांचेही वय खेळण्या बागडण्याचे आहे. मात्र त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळलाय. राजर्षी शाहू परिवार नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहिला आहे. आई-वडीलांचे छत्र हरवलेल्या भावंडांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहून त्यांची सर्व शैक्षणिक जबाबदारी स्वीकारत असल्याचे संदीपदादा शेळके यांनी जाहीर केले. यावेळी मुलांचे नातेवाईक तथा ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेची सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३ प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्या...

जनसंचलन/बुलढाणा




ग्रामविकास व पंचायतराज विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील गट-क मधील विविध संवर्गातील शासनस्तरावरुन राबविण्यात येत असलेल्या भरती प्रक्रियेसाठी जाहीरात क्र. १/२०२३ दिनांक ५ ऑगस्ट २०२३ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारांनी या जाहिरातीचे प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३साठी कनिष्ठ सहाय्यक या संवर्गाची परीक्षा दिनांक १८, १९ व २० डिसेंबर २०२३ रोजी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाची परीक्षा दिनांक २३ व २४ डिसेंबर २०२३ आणि औषध निर्माण अधिकारी या संवर्गाची परीक्षा दिनांक २१ व २६ डिसेंबर २०२३ रोजी होणार असल्याने या संवर्गातील परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषद बुलढाणा च्या या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याबाबत संबंधित उमेदवारांनी नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे, नोडल अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) आशिष विवार यांनी केले आहे.

# जिल्हा सहकार विकास समिती स्थापन करण्यास मान्यता...

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार देशातील सहकार चळवळ मजबूत करणे आणि सहकार चळवळ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य आणि जिल्हा स्तरीय समिती गठीत करण्याबाबत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने आदेश शासन निर्णयानुसार निर्गमित केले आहेत. या शासन निर्णयानुसार जिल्हा सहकार विकास समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे जिल्हा सहकार विकास समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. नवीन बहुउद्देशिय प्राथमिक कृषी सहकारी संस्था किंवा दुग्ध, मत्स्यव्यवसाय प्राथमिक सहकारी संस्था स्थापन करणे तसेच ग्रामपंचायत, गावातील प्राथमिक सहकारी संस्था आणि भारत सरकारच्या विविध योजनांच्या एकत्रीकरणाद्वारे विद्यमान प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना आणि दुग्ध, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी राज्य व जिल्हा सहकार विकास समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने नोंदणीकृत महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक संघांच्या सभासदांना ग्रामस्तरावर नवीन ग्रामसेवा सहकारी संस्था नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करुन त्यांच्या माध्यमातून नवीन सहकारी संस्था नोंदणी करण्याबाबत ठरले आहे. म्हणून जिल्ह्यातील नोंदणीकृत महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक संघ यांच्या सभासद यांनी ग्रामस्तरावर नवीन ग्रामसेवा सहकारी संस्था नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# पेण टाकळी प्रकल्पग्रस्त संतप्त शेतकरयांनी घेतल्या प्रकल्पात उड्या.

## नुकसान भरपाई म्हणून मंजूर झालेले अडीच कोटी रुपये न मिळाल्याने जलसमाधी घेत असल्याचं शेतकऱ्यांचे म्हणणे.

जनसंचलन/मेहकर

तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्पातून जाणारा कालवा दोन वर्षापूर्वी फुटला होता आणि यामुळे कालव्याच्या दोन्ही बाजूने असलेल्या हजारो हेक्टर शेती खरडून गेली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच अतोनात नुकसान झालं होतं अनेक फळबागाही वाहून गेल्या होत्या. त्यावेळी पंचनामे झाले नुकसान , भरपाई म्हणून या शेतकऱ्यांना अडीच कोटी रुपये मंजूरही झाले. मात्र दोन वर्ष झाले तरी संबंधित विभागाने या शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई चे पैसे वाटप न केल्याने आज संतप्त शेतकऱ्यांनी पेनटाकळी प्रकल्पात उड्या घेतल्या . मात्र संबंधित यंत्रणेचा कुठलाही




अधिकारी यावेळी हजर नसल्याने शेतकरी अधिकच आक्रमक झाले होते. या आंदोलनात स्वाभिमानीचेही अनेक कार्यकर्ते सामील झाले आहेत. सध्याही हे शेतकरी प्रकल्पातील खोल पाण्यात उतरलेले आहेत.

# कामाच्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करा अन्यथा दंड

जनसंचलन/बुलढाणा

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयासह इतर खाजगी क्षेत्र, इन्टरप्रायजेस, सहकारी संस्था, क्रीडा संकुले, प्रेक्षागृहे, मॉल्स, अशासकीय व संघटना, ट्रस्ट, रुग्णालये, शुश्रुषालये, वाणिज्य, शैक्षणिक, औद्योगिक कार्यालय, संस्थेत इत्यादीमध्ये १० पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे बंधनकारक केले आहे. ही अंतर्गत समिती स्थापन न करणाऱ्या कार्यालयांचे लायसन्स रद्द किंवा व्यवसाय पुढे सुरू ठेवण्यास मज्जाव करण्यात येईल. तसेच ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात येईल, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी रामेश्वर बसू यांनी केले आहे.

अंतर्गत तक्रार समितीमध्ये किमान ०५ सदस्य असावेत, समितीची अध्यक्षा महिलाच असावी, समितीमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा व एका अशासकीय सदस्याचा समावेश करण्यात यावा, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मधील कलम २६ नुसार जर एखाद्या मालकाने (अ) अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही (ब) कलम १३, १४, २२ नुसार कारवाई केली नाही (क) या कायद्यातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास लायसन्स रदद, दुप्पट दंड अशी तरतूद आहे.

या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात यांची नेमणूक केली आहे. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रत्येक तालुका स्तरावर संरक्षण अधिकारी यांना समन्वयक अधिकारी म्हणून घोषित केले आहे. तेव्हा तालुकास्तरावर महिला व बाल विकास विभाग, संरक्षण अधिकारी कार्यालयात जावून नियुक्त केलेल्या संरक्षण अधिकारी यांचेकडे अंतर्गत तक्रार समिती गठीत केल्याचा अहवाल सादर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. समिती गठीत करण्यास काही तांत्रिक व इतर अडचण आल्यास बुलडाणा तालुका कार्यक्षेत्रासाठी ९७६३७९१५८८ वर संपर्क साधावा, असे आवाहन श्री. बसु यांनी केले आहे.

# देवेंद्र फडणवीस जातीयवादी भुजबळांना ताकद देतायेत, भाजपसाठी हे चांगलं नाही : जरांगे पाटील...

वृत्तसंस्था/ छत्रपती संभाजीनगर

छगन भुजबळ कुणावरही आरोप करतात. अनेक वर्षांपासून मराठा समाजाविरोधात ते बोलतायेत. समाजा समाजात तेढ निर्माण करणारा त्यांच्या एवढा नेता दुसरा कुणी नाही. भुजबळ कलंकित नेता आहे. त्यांनी महाराष्ट्र सदनात घोटाळा केला. महाराष्ट्र लुटून खाल्ला आणि अशा व्यक्तीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ताकद देतायेत. भाजपसाठी नक्कीच ही चांगली गोष्ट नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ते छत्रपती संभाजीनगरमध्ये बोलत होते. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून सरसकट आरक्षण द्या, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केल्याने छगन भुजबळ आणि जरांगे पाटील यांच्यात गेल्या दोन महिन्यांपासून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. दोघेही महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यात सभा घेऊन एकमेकांवर शाब्दिक हल्ले चढवत आहेत. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही, असं राज्य सरकार सांगत आहे. मात्र मराठा समाजाला कुणबी दाखले दिल्याने भुजबळांच्या टीकेची धार वाढते आहे. त्यामुळे जरांगे पाटील देखील भुजबळांवर टीकेची एकही संधी सोडत नाहीयेत.संभाजीनगरच्या सभेत बोलताना जरांगे पाटील म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी भुजबळांना कमी बळ दिलं तर राज्यात दंगली होणार नाहीत. त्यांच्यावर असलेल्या महाराष्ट्र सदनासंबंधीच्या केसेस देखील काढून घेतल्या आहेत. ज्यांनी भ्रष्टाचार करून महाराष्ट्र लुटला त्यांना फडणवीसांची साथ आहे का? असा सवाल विचारून फडणवीसांनी त्यांना समाज देण्याऐवजी बळ देत असतील तर भाजपसाठी नक्कीच हा चांगला संदेश नाही भुजबळ देवेंद्र फडणवीस यांचा कार्यक्रम करण्याच्या मार्गावर आहेत. त्यांना कुणीही ओबीसी नेता मानत नाही. भुजबळ तुमचा गेम करेल, तुम्ही त्याला सूट देऊ नका. नाराजी ओढून घेऊ नका असा इशारा जरांगेंनी फडणवीसांना दिला. त्याचवेळी भुजबळ धनगर आरक्षणबाबत भूमिका स्पष्ट करत नाही. भुजबळ मुद्दामहून राज्याचं सामाजिक वातावरण खराब करतायेत. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भुजबळ हे आतापर्यंतचे सर्वात कलंकित मंत्री आ-हेत, अशा शब्दात जरांगे पाटील यांनी तोंडसुख घेतले.बीडमध्ये त्यांच्याच पाहुण्यांनी समता परिषदेच्या कार्यकर्त्यांचं हॉटेल जाळलं आणि भुजबळ विनाकारण मराठ्यांना बदनाम करत आहेत. ज्यांचं घर जळाले ते साळुंखे, क्षीरसागर बीडमध्ये झालेल्या जाळप-ोळीला मराठा समाजाला दोषी ठरवत नाहीत.



त्यांच्याच पाहुण्यांनी घर जाळलं ते लोक अटक का नाहीत? भुजबळ म्हणतात बीडमध्ये जाळपोळ झाली म्हणून तिथे गेलो. मग अंतरवालीमध्ये घरात कोंडून मारलं तेव्हा कुठे होता? तिथे महिलांचे डोके फुटले होते. तिथे यायला काय रोग आला होता का?असा संतप्त सवालही त्यांनी विचारला.

# लोकसभा निवडणुकीत शिंदे गटाच्या खासदारांना धनुष्यबाण नकोसा, कमळावर लढण्याचे वेध? नाना पटोले...

वृत्तसंस्था/ नागपूर

राजस्थान, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या घवघवीत यशामुळे महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे आगामी काळात बदलण्याची शक्यता आहे. उत्तरेतील तिन्ही राज्यात एकहाती सत्ता मिळवलेल्या भाजपचा आत्मविश्वास कमालीचा दुणावला आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदी आणि भाजपचे नाणे खणखणीत वाजेल, असा जाणकारांचा होरा आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे गटातील खासदारांना आता शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हा-वर लढण्याऐवजी भाजपच्या कमळ या चिन्हावर लढण्याचे वेध लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. हिवाळी अधिवेशन सुरु असलेल्या नागपूरमध्येही या विषयाची जोरदार चर्चा सुरु आहे. याविषयी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना विच-ारणा करण्यात आली. मात्र, नाना पटोले यांनी यावर फारसे बोलणे टाळले. शिंदे गटाच्या खासदारांना कमळाच्या चिन्हावर लढायचे असेल तर तो त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे. मला त्यावर चर्चा करायची नाही, असे नाना पटोले यांनी सांगितले. मात्र, यानिमित्ताने शिंदे गटात सुरु असलेल्या राजकीय खलबतांची उघडपणे चर्चा सुरु झाली आहे.मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढमध्ये भाजपने मोदींच्या नावावर निवडणूक लढवली होती. या राज्यांतील मतदारांनी मोदींच्या आवा-हनाला प्रतिसाद देत भाजपच्या कमळ चिन्हाला भरभरुन मतं दिली होती. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीतही कमळाची चलती राहण्याची शक्यता आहे. हीच गोष्ट हेरून शिंदे गटाच्या काही खासदारांनी शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हापेक्षा भाजपचे कमळ चिन्ह-ावर लोकसभा निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केल्याचे सांगितले जाते. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने अद्याप हा प्रस्ताव मान्य केलेला नाही.





निवडणूक आयोगातील कायदेशीर लढाईनंतर आणि बऱ्याच संघर्षानंतर शिंदे गटाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मिळाले आहे. अशात आता शिंदे गटाच्या खासदारांनी धनुष्यबाण चिन्ह सोडून कमळावर लोकसभा निवडणूक लढवली तर ते टीकेचे धनी होतील. यामुळे निर्माण होणाऱ्या सहानुभूतीचा फायदा ठाकरे गटाला मिळू शकतो. तसेच उद्धव ठाकरे यांच्याकडून पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह काढून घेण्यासाठीच शिंदे गट व भाजप-ने निवडणूक आयोगात कायदेशीर लढाईचा घाट घातला, असा संदेश मतदारांमध्ये जाऊ शकतो, अशी चर्चा आहे. त्यामुळे शिंदे गटाच्या खासदारांना कमळ चिन्हावर लढू देण्यास, भाजप मान्यता देईल का, हे पाहावे लागेल. शिवसेनेच्या एकूण १८ खासदारांपैकी १३ खासदार हे सध्या शिंदे गटात आहेत. या १३ जागांवर भाजपच्या पाठिंब्याने निवडणूक लढवण्याची शिंदे गटाची रणनीती आहे. मात्र, भाजप शिंदे गटासाठी १३ पैकी १३ जागा सोडण्यास सहजास-हजी तयार होणार नाही. त्यामुळे शिंदे गटाच्या खासदारांचा कमळाच्या चिन्ह-ावर लढण्याच्या प्रस्ताव भाजप मान्य करेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# संभाव्य चाराटंचाई टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे नियोजन...

जनसंचलन/बुलढाणा

यंदा जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने आगामी काळात जनावरांसाठी चाराटंचाईची परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे.त्यामुळे संभाव्य चाराटंचाई टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार दक्षिण पॅसिफिक महासागरातील अल-निनो या समुद्र प्रवाहाच्या सक्रियतेमुळे दे-शातील मान्सून पर्जन्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. बुलढाणा जिल्ह्यात उत्पादन होण-ारा चारा, मुरघासाची इतर जिल्ह्यात वाहतूक करण्याची बंदी आणणे, जिल्हाबाहेरील निविदा धारकांना लिलाव करण्यात येऊ नये जेणेकरून बुलढाणा जिल्ह्यात चारा टंचाई भासणार नाही आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. हे नियम पुढील आदेशापर्यंत लागू राहतील, असेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी काढण्यात आलेल्या आदेशात म्हटले आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या पत्रान्वये जिल्ह्यात सन २०२३-२४ या वर्षामध्ये खरीप व रब्बी पिक पे-



रणी, जंगल वनक्षेत्र, चराऊ क्षेत्र, झाडपाला, बांधावरील गवत या सर्व स्त्रोतापासून ९ लाख ९३ हजार ५४३ मेट्रीक टन चारा उत्पादित होणार आहे. जिल्ह्यातील पशुधनास जून २०२४ पर्यंत ८ लाख २३ हजार ८३६ मेट्रीक टन चारा आवश्यक आहे. जिल्ह्यामधील पशुधनास जूनपर्यंत ला-गणारा चारा पुरेसा असला तरी रब्बी हंगामात उत्पादन कमी झाल्यास जून २०२४ नंतर पाऊस उशिरा आल्यास जिल्ह्यात संभाव्य चारा टंचाई भासू शकते. त्यामुळे जिल्ह्यामध्ये उत्प-ादन होणारा चारा तसेच मुरघास इतर जिल्ह्यात वाहतूक करण्यास बंदी आणणे व जिल्हाबाहेरील निविदा धारकांना लिलाव देण्यात येऊ नये,असेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी आदेशात म्हटले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| 8x8 cm | 5x8 cm | 5x8 cm |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |
| Hight 8 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| 2600/- | 1800/- | 1300/- |
|---|---|---|
| Hight 12 cm, Width 12 cm | Hight 8 cm, Width 10 cm | Hight 8 cm, Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाउंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com